**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit:(1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

Estd : 1962
" A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/ दि. 04 JUL 2022

No 0 0 0 9 1

## परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था.**

**विषय -** विद्यापीठामार्फत रौप्य, सुवर्ण, अमृत व शतक महोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या महाविद्यालयांना मदत करण्याबाबत..

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विद्यापीठामार्फत रौप्य, सुवर्ण, अमृत व शतक महोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या महाविद्यालयांना मदत करण्याबाबत अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये जे महाविद्यालय वरीलप्रमाणे सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये (२५, ५०, ७५, व १००) महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे **अशाच** महाविद्यालयांनी सोबतच्या नमुन्यामध्ये माहिती भरून कृपया विद्यापीठास दोन प्रतीत दि.२०/०७/२०२२ पर्यंत पाठवावे, ही विनंती.

कळावे,

आदेशान्वये,

श्री विलास एस सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - वरिल प्रमाणे

**टीप -** सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात २५, ५०, ७५ व १०० वर्षे पुर्ण करणाऱ्या महाविद्यालयाचे स्थापना वर्ष अनुक्रमे १९९६-९७, १९७१-७२, १९४६-४७ व १९२१-२२ असे असावे.

D:\ssv\Circular.docx

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठामार्फत महाविद्यालयांना रौप्य व सुवर्णमहोत्वी वर्षात द्यावयाच्या मदतीबाबतचा प्रस्ताव

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | : | |
| २ | महाविद्यालयाचे नांव व पत्ता | : | |
| | फोन नंबर, ई-मेल व वेबसाईट | : | |
| ३ | स्थापना वर्ष | : | |
| ४ | झालेली पूर्ण वर्षे | : | |
| ५ | 2 F व 12 B मान्यता मिळालेले वर्ष | : | |
| ६ | नॅक मूल्यांकन झालेचे वर्ष | : | |
| | मिळालेली ग्रेड व सीजीपीए किमान "B" ग्रेड आवश्यक | : | |
| ७ | प्राचार्यांचे नाव व मो. नं. | : | |
| ८ | शैक्षणिक माहिती - विद्याशाखा - पदवी व पदव्युत्तर | : | |
| ९ | विद्यापीठाकडून आपणास मिळालेल्या मदतीचा कोणत्या कारणासाठी विनियोग करणार आहात | : | |
| | १) वर्गखोल्या (क्षेत्रफळ व अंदाजीत खर्च) | : | |
| | २) प्रयोगशाळा दुरूस्ती (तपशीलासह अंदाजीत खर्च) | : | |
| | ३) क्रिडांगण (तपशीलासह अंदाजीत खर्च) | : | |
| | ४) वसतिगृह (तपशीलासह अंदाजीत खर्च) | : | |
| | ५) इतर | : | |
| १० | सी डी सी ठरावाची प्रत | : | |

वरील सर्व माहिती बरोबर आहे विद्यापीठाने वरील तपशीलानुसार मदत दिल्यास सदरची मदत ज्या कारणासाठी दिलेली आहे त्याच कारणासाठी त्याचा विनियोग करून त्याचे विनियोग प्रमाणपत्र विद्यापीठास वेळेत सादर केले जाईल.

कळावे, ही विनंती.

आपला विश्वासू

दिनांक

प्राचार्य सही व शिक्का

## नियमावली :

१. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून पात्र महाविद्यालयासाठी लागू राहील.

२. ज्या महाविद्यालयांना अनुक्रमे २५, ५०, ७५, व १०० शैक्षणिक वर्ष पूर्ण होणार आहेत, त्या महाविद्यालयांना विद्यापीठाकडून प्रोत्साहनपर विशेष आर्थिक मदत खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| शैक्षणिक वर्ष | प्रोस्ताहनपर निधी |
|---|---|
| २५ | रू. २.५ लाख |
| ५० | रू. ५ लाख |
| ७५ | रू. ७.५ लाख |
| १०० | रू. १० लाख |

३. या योजनेअंतर्गत विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या रक्कमेचा उपयोग महाविद्यालयाने अत्यावश्यक बाबी पूर्ण करण्यासाठी, उदा. पुस्तके, ग्रंथालय, परिक्षा स्ट्राँगरूम, भौतिक सुविधा इ. साठी करणे वापरणे आवश्यक आहे.

४. संबंधीत पात्र महाविद्यलयांनी त्यांना मिळालेल्या रक्कमेचा विनियोग योग्य पध्दतीने करून उपयोगीता प्रमाणपत्र विद्यापीठास वेळेत सादर करणे बंधनकार आहे.

५. महाविद्यालयाचे नॅक झालेले असावे.

६. महाविद्यालयास 2 (F) व 12 (B) युजीसी मान्यता असावी.

७. अनुदान पायाभूत सुविधांसाठीच खर्च करावे.

८. विद्यापीठाने मंजूर केलेल्या निधीतून केलेले विकास कामाचा दर्शनी भागावर शिवाजी विद्यापीठाचा उल्लेख असाव.

९. विद्यापीठाने मंजूर केलेली रक्कम त्याच कारणास्तव खर्च करावी.

१०. सोबत उपरोक्त महोत्सवी वर्षासाठी महाविद्यालयाने करावायाचा अर्जाचा नमुना तयार केला आहे त्या नमुन्यामध्ये सर्व कागदपत्रासह प्रस्ताव सादर करावा, प्राप्त प्रस्तावांचा विचार करण्यात येईल.